# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## स्थानिक संस्था कर विभाग

---

## जाहिर आवाहन

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व व्यापारी/व्यावसायिक यांना जाहिर आवाहन करण्यात येते की, दिनांक ०१ एप्रिल २०१३ पासून स्थानिक संस्था कर लागू झालेला आहे. स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील नियमांचे अनुषंगाने सर्व व्यापारी/व्यावसायिक यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. नियम ३ मधील तरतुदीनुसार नोंदणीस पात्र असणा-या व्यापारी/ व्यावसायिकाने नोंदणी करुन व्यवसाय करणे आवश्यक आहे. त्यामुळे अदयापही ज्या व्यापारी/व्यावसायिकांनी नियम ३ मधील तरतूदी नुसार नोंदणी केलेली नाही त्यांनी तात्काळ नोंदणी करण्याची कार्यवाही करावी.

२. नोंदणीकृत व्यापारी/व्यावसायिक यांनी नियम २९ मधील तरतूदीनुसार ज्या महिन्याच्या संबधित स्थानिक संस्था कर देय आहे अशी स्थानिक संस्था कराची रक्कम त्या पुढील महिन्याच्या २० तारखेला किंवा त्यापूर्वी भरणा करणे आवश्यक आहे. अन्यथा विहीत मुदतीत भरणा न केल्यास दरमहा २% प्रमाणे शास्ती रक्कम लागू होते याची नोंद घ्यावी. त्यामुळे दरमहा विहित मुदतीत कर भरणेची दक्षता घ्यावी.

३. नियम ९ मधील तरतूदीनुसार विक्रीकर विभागाकडे VAT रजिस्ट्रेशन असलेल्या व्यापारी/ व्यवसायिकास Local Body Tax करीता नोंदणीकृत व्यापारी समजणेत आलेले आहे त्यामुळे ज्यांनी अदयाप पर्यंत Log-In करुन User-ID घेतलेला नाही, अशा व्यापारी / व्यावसायिकांनी सदर कार्यवाही तात्काळ करणे आवश्यक आहे.

४. वरीलप्रमाणे कार्यवाही न केल्यास स्थानिक संस्था कर नियमातील नियम ४८ मधील तरतूदीनुसार नियमाधीन कारवाई आपणांविरुध्द होईल याची कृपया नोंद घ्यावी.

५. स्थानिक संस्था कर विषयक नियम, दरपत्रक, इतर माहिती मनपाचे **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईट वर उपलब्ध् आहे. तसेच नोंदणी करणेबाबत काही अडचण निर्माण होत असेल तर स्थानिक संस्था कर विभागाचे प्रभाग कार्यालय व मुख्य कार्यालय यांचेशी समक्ष संपर्क साधावा.

**(डॉ. श्रीकर परदेशी)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - ३३६
दिनांक१२/१२/२०१३